# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### काळवटी तलावाजवळील (ता.अंबाजोगाई) वीज जोडणी कापल्यानंतरही शेतकऱ्यांना वीज बिल आकारणी सुरूच असल्याबाबत

**(१) ४१३ (१८-०३-२०२०) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई तालुक्यातील काळवटी तलाव सन १९९८-१९९९ पासून पिण्यासाठी आरक्षित असून त्या तलावाजवळील विद्युत जोडणी कायमस्वरूपी बंद केली असूनही शेतकऱ्यांना वीज बील आकारणी सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१७-१२-२०२१) :** (१) सदर काळवटी तांडा तलावावर अंबाजोगाई पाणीपुरवठा वगळता कोणालाही अधिकृत वीज जोडणी दिलेली नाही. या तलावावरील अनाधिकृत वीज जोडणी खंडीत केलेली आहे. या

तलावाच्या बाहेरील क्षेत्रात ६ विहिरी व ४ बोअर आहेत. त्यांना अधिकृत कनेक्शन दिलेले आहेत. या अधिकृत ग्राहकांची वीज जोडणी खंडीत केलेली नाही. त्यामुळे वीज जोडणी खंडीत केल्यानंतरही शेतकऱ्यांना वीज बिल आकारणी सुरुच आहे असे म्हणता येणार नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पैठण (जि.औरंगाबाद) येथील निधी उपलब्ध असूनही रोहित्राचे तार कंपाऊंडचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(२) ४२३५ (१४-०९-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) महावितरणाच्या शहरातील धोकादायक असलेल्या ११२ रोहित्रापैकी ४६ रोहित्राच्या तार कंपाऊंडकरीता जवळपास रुपये १४ लाख पैठण-आपेगाव विकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन निधी मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करारानुसार माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान प्रत्यक्षात कामास सुरुवात करुन ६ महिन्यांच्या आत काम पूर्ण करणे अपेक्षित असताना जून, २०२० संपत आला तरी काम अपूर्ण असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदारावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) पैठण शहरातील (जि.औरंगाबाद) महावितरणाच्या धोकादायक असलेल्या ११२ रोहित्रांपैकी ४६ रोहित्रांना तार कंपाऊंड करण्यासाठी मे.स्पाईक इलेक्ट्रिकल, अहमदनगर यांना कार्यादेश देण्यात आले होते. सदरील सर्व ४६ रोहित्रांच्या तार कंपाऊंडची कामे पूर्ण झालेली आहेत.

(३) महावितरणद्वारा संबंधित कंत्राटदारास दिलेल्या जून, २०१९ मध्ये दिलेल्या कार्यादेशात पावसाळयाचा कालावधी लांबणे, वादळी पावसात विद्युत उपकरणाच्या ना दुरुस्तीमुळे वीज पुरवठा बंद करता न येणे, कोविड परिस्थितीमुळे काम लांबल्याने नोटीस टू करेक्ट कंत्राटदारास देण्यात येऊन कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मॅग्नेटिक महाराष्ट्र-२ अंतर्गत मराठवाड्यात उद्योग नसल्याबाबत

**(३) ४६३८ (१४-०९-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॅग्नेटिक महाराष्ट्र-२ अंतर्गत राज्यात १६ हजार ३० कोटी रुपयांचे करार करण्यात आले, त्यातील एकही उद्योग मराठवाड्यातील औद्योगिकदृष्टया मागासलेल्या भागात येणार नसल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे सर्व उद्योग मुंबई, ठाणे व पुणे या औद्योगिक क्षेत्रातच येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याचा चौफेर विकास करण्यासाठी व मराठवाड्यातील मागासलेपण दुर करण्यासाठी मराठवाड्यात कधीपर्यंत व किती उद्योग येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२०-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

मॅग्नेटिक महाराष्ट्र २ अंतर्गत मराठवाड्यातील प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लातूर, नांदेड व औरंगाबाद विभागातंर्गत एकही सामंजस्य करार करण्यात आलेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शासनाने सामुहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत विदर्भ/मराठवाड्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम तसेच मोठ्या व विशाल प्रकल्पांना आकर्षित करण्यासाठी आणि रोजगार निर्माण करण्यासाठी

अतिरिक्त वित्तीय प्रोत्साहने व प्रोत्साहने उपभोगण्यासाठी अधिकचा कालावधी दिलेला आहे. तसेच आर्थिक प्रोत्साहन देण्यासाठी विशेष सवलती दिलेल्या आहेत.

मराठवाडा /विदर्भासाठी रोजगारावर आधारित मोठ्या, विशेष मोठ्या, विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांसाठी,किमान गुंतवणुकीची तसेच रोजगार निर्मितीसाठीची किमान मर्यादा राज्याच्या इतर भागांपेक्षा कमी आहे. राज्याचा समतोल औद्योगिक विकास साधने हे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ चे उद्दिष्ट आहे. सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ नुसार मराठवाडा विभागातील MSME आणि Large घटकांना सामुहिक प्रोत्साहन योजनेचे फायदे देण्याची कार्यवाही सुरु झाली आहे. व त्याव्दारे झालेली गुंतवणुक व रोजगार याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| विभाग/कार्यालय | MSME/ Large /Meg. | पात्रता प्रमाणपत्र दिलेल्या घटकांची संख्या | गुंतवणुक (कोटीत) | रोजगार |
|---|---|---|---|---|
| औरंगाबाद विभाग | MSME | १९२ | ७५२.७७ | ३८८७ |
| नांदेड विभाग | MSME | १२९ | १८५.८९ | १८२३ |
| उद्योग संचालनालय | Large | ०७ | २२८.६२ | १७६० |
| | Mega | ०६ | २२१५.६३ | ५३७४ |
| एकूण | | ३३४ | ३३८२.९१ | १२८४४ |

उद्योग विभागाकडून नविन उद्योगाकरीता व विस्तारीकरण करीता माहे जून, २०२० नंतर १६ विशाल प्रकल्पांना देकारपत्र देण्यात आले असून, त्यांची गुंतवणुक रुपये ५४८२.७५ कोटी इतकी असून, ७६१२ इतकी रोजगार क्षमता आहे. तसेच उद्योग संचालनालयाकडून मराठवाड्यातील औरंगाबाद व नांदेड विभागाकरीता माहे जून, २०२० नंतर ०७ मोठे (गुंतवणुक रुपये २२८.६२ कोटी व रोजगार १७६०) व औरंगाबाद व नांदेड विभागाकरीता माहे जून, २०२० नंतर ०६ विशाल (गुंतवणुक रुपये २२१५.६३ कोटी व रोजगार ५३७४) प्रकल्पांना पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाव्दारे उद्योग घटकांना नोंदणी करण्याकरीता उद्यमी पोर्टल विकसीत करण्यात आले असून, जुलै, २०२० पासून सप्टेंबर, २०२१ या कालावधीत

मराठवाड्यातीनल औरंगाबाद व नांदेड विभागातंर्गत एकूण १२०५३४ (समाविष्ट रोजगार ५४२१४७) इतक्या घटकांची नोंदणी झालेली आहे.

राज्याचा संतुलित औद्योगिक विकास साधण्यासाठी राज्य शासन सर्वोतोपरी प्रयत्नशील असून, विदर्भ/मराठवाड्यात गुंतवणुक वाढावी याकरीता विविध बैठका, चर्चासत्रे व कार्यक्रमाव्दारे जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच विदर्भ /मराठवाड्यात गुंतवणुक करु इच्छिणाऱ्या गुंतवणुकदारांना सर्वोतोपरी मार्गदर्शक व सहाय्य करण्यासाठी, त्यांचे शंकानिरसन करण्यासाठी विदर्भ व मराठवाड्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पणन विभागात स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले आहेत. तसेच विदर्भामधील औद्योगिकरणासाठी वाव असणाऱ्या कापड उद्योग, अन्न प्रक्रिया उद्योग व संरक्षण व अवकाश क्षेत्रातील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी विशेष समर्पित धोरणे आखण्यात आली आहेत. तथापि, प्रकल्प कोठे उभारावा ही बाब सर्वस्वी उद्योजकावर अवलंबून आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली येथील ड्रायपोर्ट उभारणीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४) ४८४१ (२३-११-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात गेल्या चार वर्षापूर्वी ड्रायपोर्ट उभारण्याची घोषणा करण्यात आली, त्यासाठी रांजणी (ता.कवठेमहाकाळ, जि.सांगली) येथील मेष पैदास केंद्राच्या २२०० एकर जमिनीतील रेल्वेमार्गाकडील २०० एकर व अन्य सुमारे ४० एकर जागेचे भूसंपादन झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ड्रायपोर्ट मुळे जिल्ह्यातील द्राक्षे, बेदाणा, डाळिंब, मिरची, हळद, गूळ, मका, भाजीपाला तसेच शेजारील कर्नाटक सीमा भाग, सातारा, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी, उद्योजक, व्यापारी, दूध उत्पादक, साखर कारखाने यांचा माल निर्यात करण्याची सोय होणार असून, चार वर्षापूर्वी घोषणा झालेल्या व भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झालेली असताना देखील सांगली येथील ड्रायपोर्ट उभारणीचे काम पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांगली येथील ड्रायपोर्ट उभारणीचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (११-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

जेएनपीटी व महाराष्ट्र शासन यांचे दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराचे अनुषंगाने रांजणी ता.कवठेमहाकाळ, जि.सांगली येथील खाजगी ४३.९४ हे.आर. व सरकारी ९१.०० हे.आर क्षेत्र ड्रायपोर्टसाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे सदर क्षेत्रालगत असणारे शेळी मेंढी महामंडळाचे २२८५ एकर जागेवर औद्योगिक क्षेत्र विकसित करणेचे जेएनपीटी मार्फत सूचित करण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूनिवड समितीमार्फत स्थळपाहणी करणेत आली असून सरकारी ९१.०० हे.आर क्षेत्राचे संपादन जेएनपीटीने करावे व खाजगी ४३.९४ हे.आर जागा खातेदारांचे संमतीने महामंडळामार्फत संपादन करणेबाबत निर्णय घेणेत आला आहे. खाजगी क्षेत्र संपादनाकरीता जमीन निश्चितीची कार्यवाही सुरु आहे.

तसेच शेळी मेंढी महामंडळाचे संबंधित जागेवर गुरचरण, मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व मेष पैदास केंद्र असल्याने सदर जागा औद्योगिक क्षेत्रासाठी सुयोग्य नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत

**(५) ५१९३ (२३-११-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात मा.सामाजिक न्याय मंत्री व सचिव, सामाजिक न्याय विभाग यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास समाजकार्य महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेनी मागण्यांची पूर्तता करण्याकरीता लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय व समाजकल्याण विभागांतर्गत चालविण्यात येणारी समाजकार्य महाविद्यालये अद्यापी ७ व्या वेतन आयोगापासून वंचित असून ही महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत दैनिक लोकसत्ता नागपूर या वृत्तपत्रात दिनांक ८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास बातमी प्रसिध्द झाली असून महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेशन या संघटनेच्यावतीने शासनास अनेक वेळा निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाजकार्य महाविद्यालयातील दिले जाणारे शिक्षण व हा विषय शिक्षण विभागांतर्गत कसा व कोणत्या कारणाने जोडण्यात आला तसेच समाजकार्य महाविद्यालातील शिक्षण/कर्मचारी हे अद्यापपर्यंत ७ व्या वेतन आयोगाच्या लाभापासून वंचित आहेत व त्यांच्या अनेक मागण्या दीर्घ कालावधीपासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२७-१२-२०२१) :** (१) व (२) होय.

(३) व (४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातंर्गत एकूण ५४ समाजकार्य महाविद्यालयांपैकी १ बंद, ३ विनाअनुदानित व ५० महाविद्यालये सदर समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित वेतन व उच्च व तंत्र शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवेविषयक सोयी सुविधा (रजा प्रवास सवलत, वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती, अतिरिक्त कामाबद्दल वेतन, आगाऊ वेतनवाढ, कालबध्द पदोन्नत्ती देण्याची

योजना) दिनांक १६/०८/२००५ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. तसेच सेवेत असताना दिवगंत झालेल्या समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वारसास अनुकंपा तत्वावर नोकरी या सुविधा दिनांक ६ एप्रिल, २०२१ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त वेतन व उपदान योजना दिनांक २३ नोव्हेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०२/०९/१९९९ पासून लागू करण्यात आलेली आहे. समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष संवर्गास दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ व शिक्षकेतर कर्मचारी यांना दिनांक २९ जानेवारी, २०२१ च्या शासन निर्णयान्वये सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(६) ५६४४ (१८-११-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान रिलायन्स गॅस पाईपलाईन कंपनीकडून गॅस पाईपलाईन टाकण्यात आल्यानंतरही सदर कंपनीने शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला दिला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जत तालुक्यातील अवसरे, बिरदोले, कोदिवले, वंजारपाडा, तळवडे, पिंपळोली, नसरापूर, कडाव येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०२० रोजी कर्जत तहसिलदार कार्यालयासमोर रिलायन्स इथेन गॅस प्रकल्पात अधिग्रहीत केलेल्या जमिनींचा मोबदला देण्याबाबत आणि इतर मागण्यांसाठी साखळी उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांच्या मागण्यांवर त्वरित कार्यवाही करण्याचे आश्वासनास एक महिना होऊनही प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२८-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

कर्जत तालुक्यातील अवसरे, बिरदोले, कोदीवले, वंजारपाडा,तळवडे, पिंपळोली, नसरापूर, कडाव येथील बाधित शेतकऱ्यांना पेट्रोलीयम ॲण्ड मिनरल गॅस पाईपलाईन (जमीनीच्या वापराच्या हक्काचे संपादन) कायदा १९६२ चे कलम १० व पेट्रोलीयम ॲण्ड मिनरल गॅस पाईपलाईन (जमीनीच्या वापराच्या हक्काचे संपादन) कायदा १९६२ चे कलम ४अ प्रमाणे दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार संबंधित शेतकऱ्यांना (Interested Persons) फक्त पिकांची व इतर नुकसान भरपाई देय आहे.त्यानुसार प्रत्यक्ष जागेवर पंचनामा केला आहे.पंचनामा नुसार संबंधित शेतकऱ्यांना देय असलेली पिकांची व इतर नुकसान भरपाई अदा केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास विभागांतर्गत निविदा न काढताच कामे देऊन कोट्यवधी रुपयांच्या झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(७) ५६८२ (१३-११-२०२०) श्री.संजय दौंड, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या योजनांसाठी केंद्र शासनाकडून विशेष केंद्रिय सहाय्य निधीतून राज्य शासनास दरवर्षी २०० कोटी रुपये दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतुन सन २०१७ पासून कंत्राटी पध्दतीवर कामे देतांना निविदा न काढताच परस्पररित्या काही विशिष्ट संस्था व एनजीओलाच कामे दिली असल्याचे तसेच दिल्ली येथील एका संस्थेला रुपये २५० कोटीचे भोजन पुरवण्याचे कंत्राट दिले असल्याने एकेका संस्थेला १०-१० कामांची कंत्राटे दिली असल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थांना निविदा न काढताच देण्यात आलेल्या कामांची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत मा.आदिवासी विकास मंत्री यांनी जाहीर केले असून भोजन कंत्राटासंदर्भातील २५० कोटी रुपये प्रकरणी शासनाच्या वित्त विभागामार्फत देखील चौकशी करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२१-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) केंद्र शासनाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत अनुदान, विशेष केंद्रीय सहाय्य व आदिम जमाती विकास कार्यक्रम अंतर्गत योजनांच्या नियोजन व अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शक सुचना निश्चित केल्या आहेत. त्यानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय, शासकीय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी नामवंत संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात येते.

यानुषंगाने सर्व स्तरातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्राथमिक छाननी करून नाविन्यपूर्ण प्रस्तावांची प्राथमिक निवड करण्यात येते.

सदर प्रस्तावाना अंतिम करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या पॅनेल समोर संबंधित यंत्रणा/संस्थांचे सविस्तर सादरीकरण करण्यात येवून प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीची मान्यता घेवून केंद्र शासनाच्या जन जाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथील Project Appraisal Committee (PAC) यांची मान्यता घेवून प्रस्तावांना केंद्र शासनामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येत असतो.

सदर प्रकल्पांची सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने शासन निर्णय निर्गमित करुन सामंजस्य करार व कार्यादेश देवून अंमलबजावणी करण्यात येते.

सन २०१८-१९ करीता निधी मिळण्यास्तव वरील कार्यपध्दतीचा अवलंब करुन जनजाती कार्यमंत्रालयास प्रस्ताव सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावांत केंद्र शासनाकडून भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत सन २०१८-१९ करीता ३ मध्यवर्ती स्वयंपाकगृह प्रकल्प जव्हार, नंदुरबार व घोडेगाव येथे सुरु करण्याच्या रुपये १२.०० कोटी किमतीच्या प्रस्तावास देखील मान्यता प्राप्त झाली आहे. अशा संस्था संदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वस्तुस्थिती तसेच विभागाद्वारे अवलंबिण्यात आलेली कार्यवाही वित्त विभागास सादर करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील एमआयडीसी क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक हब उभारण्याबाबत

**(८) ५८७० (१४-१२-२०२०) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑटोमोबाईल्स उद्योगांचा हब असलेल्या औरंगाबाद इलेक्ट्रॉनिक्स उद्योगालाही चालना मिळावी यासाठी ऑटोमोबाईलप्रमाणेच जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये केवळ दहा एकर जागेत इलेक्ट्रानिक्स पार्क उभारण्यात यावा, अशी मागणी मागील दहा वर्षांपासून चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चरच्यावतीने केंद्र व राज्य शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जगातील प्रत्येक वाहनांमध्ये औरंगाबादच्या ऑटोमोबाईल हबमध्ये तयार प्रमुख भागाशिवाय एकही वाहन तयार होऊच शकत नाही, असा दावा स्थानिक उद्योजक करीत असून त्यासाठी इलेक्ट्रॉनिक हबची मागणी गेल्या दहा वर्षापासून करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने अलिकडेच मंजूर केलेल्या पुणे शहराच्या धर्तीवर औरंगाबाद येथील शेंद्रा किंवा वाळूंज एमआयडीसी क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक्स पार्क उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२८-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रामध्ये मे.देवगिरी इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टर प्रा.लि. यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दिनांक १०/०१/२०१४ च्या परिपत्रकान्वये ८००० चौ.मी. भूखंड इलेक्ट्रॉनिक्स पार्क करीता वाटप करण्यात आला आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरींग क्लस्टर या केंद्र शासनाच्या योजनेत राज्याच्या हिश्श्याचे १०% अंशदान रुपये २.७२ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उपलब्ध करून दिली आहे.

मे.देवगिरी इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टर प्रा.लि. यांनी सदर जागेशेजारील इलेक्ट्रॉनिक्स पार्क करीता राखीव २ एकर जागा वाटप करण्याची विनंती केली आहे. शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात ई-निविदा पध्दतीने औद्योगिक भूखंड वाटपाचे धोरण आहे. त्यानुषंगाने ज्या वेळी सदर २ एकर जागेचे भूखंड पाडून ई-निविदा मध्ये ठेवण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल त्यावेळी सदर ई-निविदा पध्दतीमध्ये भाग घेऊन भूखंड घेण्यात यावेत असे मे.देवगिरी इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टर प्रा.लि. यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाथरी येथे सहाय्यक निबंधक कार्यालय स्थापन करणेबाबत

**(९) ८६८५ (१३-०७-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी तालुक्यातील ५६ गावातील नागरीकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन पाथरी तालुक्यासाठी सहाय्यक निबंधक (सहकार विभाग) कार्यालय स्थापन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२१ मध्ये मा.सहकार मंत्री यांच्याकडे ई-मेलव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाथरी तालुक्यासाठी स्वतंत्र सहाय्यक निबंधक कार्यालय स्थापन करुन कर्मचारी नेमणुकीबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या थकीत वेतनासह नियमितपणे मासिक वेतन मिळण्याबाबत

**(१०) ९३२३ (१५-०६-२०२१) डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या राज्यातील ५१ समाजकार्य महाविद्यालयातील ५५९ शिक्षक व ७०८ शिक्षकेतर कर्मचारी यांचे मागील ३ महिन्यांपासून वेतन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाने सामाजिक न्याय विभागासाठी रुपये १,२५३ कोटी विविध योजनांसाठी मंजूर केले असून त्यात आश्रमशाळा कर्मचारी आणि समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कोणतीही तरतूद नसल्याने अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही समाजकार्य महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्याची मागणी विविध शिक्षक संघटनांनी तसेच नागपूर विभागाचे शिक्षक जनप्रतिनिधींनी दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी तसेच दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास व त्यापूर्वी शासनाकडे वारंवार अनेकवेळा निवेदने देवून व सभागृहात संविधानिक आयुधांचा उपयोग करून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी) सर्व नियम, शैक्षणिक अर्हता वेतनश्रेणी हे इतर महाविद्यालयाप्रमाणे समाजकार्य महाविद्यालयानाही लागू होतात मात्र समाजकार्य महाविद्यालये अद्यापी उच्च शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत न केल्याने सदरहू समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रश्न प्रलंबित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या थकीत ३ महिन्यांच्या वेतनासह यापुढे नियमितपणे मासिक वेतन मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२७-१२-२०२१) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

(३) होय.

(४) व (५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातंर्गत एकूण ५४ समाजकार्य महाविद्यालयांपैकी १ बंद, ३ विनाअनुदानित व सदर समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित वेतन व उच्च व तंत्र शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवेविषयक सोयी सुविधा (रजा प्रवास सवलत, वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती, अतिरीक्त कामाबद्दल वेतन, आगाऊ वेतनवाढ, कालबध्द पदोन्नत्ती देण्याची योजना) दिनांक १६/०८/२००५ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. तसेच सेवेत असताना दिवगंत झालेल्या समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वारसास अनुकंपा तत्वावर नोकरी या सुविधा दिनांक ६ एप्रिल, २०२१ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेला आहे. सदर समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त वेतन व उपदान योजना दिनांक २९/१०/२०१४ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०२/०२/१९९९ पासून लागू करण्यात आलेली आहे. समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष संवर्गास दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ व शिक्षकेतर कर्मचारी यांना दिनांक २९ जानेवारी, २०२१ च्या शासन निर्णयान्वये सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन धोरणांच्या उद्दिष्टांमध्ये उद्योग उपक्रमांची नादारी व कर्जबाजारी या समस्यांमधून मुक्तता करण्यासाठी सल्लागार कक्षाची स्थापना करण्याबाबत

**(११) ९४७३ (१३-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नवीन औद्योगिक धोरण-२०१९ जाहीर करतांना नवीन धोरणांच्या उद्दिष्टांमध्ये सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग उपक्रमांची नादारी व कर्जबाजारी या समस्यांमधून मुक्तता करण्यासाठी सल्लागार कक्षाची स्थापना केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सल्लागार कक्षाच्या माध्यमातून नाशिक जिल्हयातील सिन्नर सहकारी औद्योगिक वसाहतीमधील आज वर्षानुवर्षे बंद असलेल्या २४ उद्योग घटकांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यासंदर्भात उद्योग संचालनालयास आदेश जारी करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२७-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण २०१९ मधील मुद्दा क्रमांक ९.६ "सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची नादारी व कर्जबाजारीच्या समस्यांमधून सोडवणूक करण्यासाठी सल्लागार कक्ष" आहे.

महाराष्ट्र राज्यातील सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या नादारी व कर्जबाजारीच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी व संबंधित घटकांना मार्गदर्शन करण्यासाठी नादारी व दिवाळखोरी संहिता २०१६ अंतर्गत प्रादेशिक विभागवार कक्ष महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांनी स्थापन केलेले नाहीत.

तथापि, राज्य शासनाने पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या व बंद उद्योगांसाठी “विशेष अभय योजना” दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी घोषित केली आहे.

---

## राज्यात कोरोना महामारीमुळे लहान-मोठे उद्योग, व्यापार बंद असतानाही व घरगुती ग्राहकांना अवास्तव विजेची बिले आकारल्याबाबत

**(१२) ९८०८ (१७-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना महामारीमुळे लहान-मोठे उद्योग, व्यापार बंद असतानाही व्यापाऱ्यांना व घरगुती ग्राहकांन अवास्तव विजेची बिल येत असल्याचे दिनांक १८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज ग्राहकांना विद्युत देयकात आकारण्यात आलेली अनामत रक्कम कमी करुन योग्य ती रक्कम अदा करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांना व घरगुती ग्राहकाना वाजवी पेक्षा जादा रकमेचे आलेले विद्युत देयक तपासून योग्य त्या रकमेचे वीज देयक आकारण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४७ च्या उप कलम (१) च्या खंडातील तरतुदीनुसार ज्या व्यक्तीला विद्युत पुरवठा मंजूर करण्यात आला आहे अशा व्यक्तीकडून सुरक्षा अनामतीच्या रकमेची मागणी करण्यात येते.

(३) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांना व घरगुती ग्राहकांना वाजवी पेक्षा जादा रकमेचे वीज देयक आकारण्यात आलेले नाही. ग्राहकांना वीज देयकाबाबत शंका असल्यास ते महावितरणच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधून अथवा महावितरणच्या online संपर्क माध्यमांद्वारे (call centers, Mobile App, WSS किंवा Missed Call Facility इत्यादी) आपली तक्रार नोंद करु शकतात. सदर तक्रारींचे त्वरित निरसन केले जाते. तसेच देयकांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या त्वरित दुरुस्त करुन देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना एसडीआरएफ/एनडीआरएफ या आपत्तीव्यवस्थापन संस्थांतर्गत मदत जाहीर न झाल्याबाबत

**(१३) १००५३ (१७-०६-२०२१) श्री.रामराव पाटील** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने कर्जमाफी जाहीर करुनही अद्‌याप शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात माहे जानेवारी ते मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद बल (एनडीआरएफ) /एसडीआरएफ नियमाप्रमाणे देय मदत देखील अद्‌याप शेतकऱ्यांना मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना एसडीआरएफ/एनडीआरएफ नियमाप्रमाणे देय मदत तात्काळ मिळावी, यादृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२०-१२-२०२१) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) माहे मार्च, एप्रिल, मे, २०२१ या कालवधीत गारपीट व अवेळी पावसामुळे शेतीपीकाचे/फळपीकांचे नुकसान झाल्यामुळे केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF)/राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) दरानुसार दिनांक

०६/१०/२०२१ च्या शासन निर्णयान्वये रुपये १२२.२६ कोटीचा तसेच दिनांक ०२/११/२०२१ च्या शासन निर्णयान्वये ८.५८ कोटीचा निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पुणे व नाशिक बाजार समितीच्या प्रत्येक घटकातील कर्मचाऱ्यांचा कोरोना काळात विमा उतरवण्याबाबत

**(१४) १०२५४ (२९-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पुणे व नाशिक बाजार समितीच्या कर्मचारी संघाने शेतकरी, कामगार, राज्य शासनाचे सर्व विभाग आणि कर्मचारी कोरोनाशी मुकाबला करीत असताना बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना ५० लाखांचा विमा उतरवा अथवा बाजार बंद करू असे निवेदन पणन संचालकांना दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अनेक बाजार समित्यांमध्ये कर्मचारी कोरोना बाधित होऊन जीवितास मुकले त्यांच्या पश्चात कुटुंबियांना बाजार समिती व्यवस्थापन व शासनाने मदत केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोनाच्या परिस्थितीत प्रत्येक घटक कोरोनाशी लढत शेतमाल पुरवठा सुरळीत रहावा अन्न साखळी सुरक्षित रहावी यासाठी इतर अत्यावश्यक सेवेतील घटकांप्रमाणे बाजार समितीतील कर्मचाऱ्यांना ५० लाखांचा विमा व कोरोना काळातील सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी कर्मचारी संघाने केली त्यानुसार शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२१-१२-२०२१) :** (१) होय.

महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्या., पुणे व महाराष्ट्र राज्य बाजार समिती कर्मचारी संघ, पुणे यांनी अनुक्रमे दिनांक २०/०४/२०२१ व दिनांक २२/०४/२०२१ रोजी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निवेदन दिले आहे.

(२) व (३) कोरोनाच्या पाश्वभुमीवर “अ”, “ब” व “क” वर्गातील बाजार समित्यांनी त्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांचा वैयक्तिक विमा उतरविणेबाबत विमा कंपन्याशी वाटाघाटी करून निर्णय घ्यावा. “ड” वर्गातील बाजार समित्या तोटयात असल्यातरी तेथील कर्मचाऱ्यांना सुरक्षा कवच देणेबाबत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी पुढकार घेवून त्यांच्या मार्फत सुरक्षा कवच देण्याबाबत विचार करावा. आर्थिकदृष्टया सक्षम बाजार समित्यांनी त्यांच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांना कोरोना काळात केलेल्या कामकाजाबद्दल एक अतिरिक्त वेतनवाढ देण्याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय घ्यावे तसेच बाजार समितीच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटूंबातील एका पात्र व्यक्तीस अनुंकपा नियुक्ती देणेबाबत बाजार समितीने विचार करावा असे पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १९/०७/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व बाजार समित्यांना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्थामार्फत सूचना निर्गमित केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी दिला जाणारा निधी त्याच विभागासाठी वापरण्यात येऊन अनेक योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(१५) १०२६४ (२९-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी दिल्या जाणाऱ्या निधीचा पुरेपुर विनियोग न झाल्याने हजारो कोटींचा निधी अन्य विभागाला दिला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता या विभागासाठी देण्यात आलेला निधी सदर विभागास वितरित करण्यात आला नसल्याचे तसेच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठीचा निधी मागील २० वर्षापासून इतर विभागात वळविला जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अनुसूचित जातीच्या अनेक योजना कार्यान्वित राहून त्यांना हक्काचा निधी देण्यासाठी कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२०-१२-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.

अनुसूचित जाती घटक योजनेचा अखर्चित निधी अन्य विभागास वळविण्यात येत नाही.

(२) सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभूमिवर खर्चास काही मर्यादा होत्या. सबब अनुसूचित जाती उपयोजनेकरीता अर्थसंकल्पीत रुपये ९६६८ कोटी निधीपैकी रुपये ७८९६.३८ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून रुपये ६४६३.५७ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेसाठी अर्थसंकल्पीत निधी अनुसूचित जाती उपयोजना वगळून इतरत्र वळविण्यात येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या योजनेंतर्गत मंजूर असलेले प्रलंबित कर्ज वितरित करण्याबाबत

**(१६) १०२६८ (२९-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या योजनेंतर्गत मंजूर असलेली प्रलंबित कर्ज प्रकरणे निकाली काढण्यात यावीत यासाठी औरंगाबाद येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या सप्ताहात आंदोलन करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा फुले मागासवर्गीय विकास आर्थिक महामंडळ, औरंगाबाद येथील जिल्हा कार्यालयात पाच ते सात वर्षांपासून गरीब, गरजू, बेरोजगार, सफाई कामगारांनी संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करुन महामंडळाच्या एन.एस.के., एफ.डी.सी.या कर्ज योजनेतून अनेक प्रकरणे दाखल झाली असून त्यांस शासनाने मंजुरी देऊनही निधी अभावी अद्याप कर्ज वितरित करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर योजनेंतर्गत असणारी प्रलंबित कर्जप्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२८-१२-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) योजनेंतर्गत प्रलंबित कर्ज प्रकरणांची पूर्तता करण्याबाबत सर्व जिल्हा व्यवस्थापकांना निर्देश देण्यात आले होते. एकूण कर्ज प्रकरणांपैकी ५२७९ कर्ज प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. प्राप्त आढाव्यानुसार औरंगाबाद विभागामध्ये सर्वाधिक म्हणजे ४२४१ कर्ज प्रकरणे प्राप्त झालेली आहेत.

कर्ज प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी लाभार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करणे आवश्यक असल्याने दिनांक ०७/१०/२०२१ ते २७/१०/२०२१ या कालावधीत महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक व इतर कर्मचाऱ्यांमार्फत औरंगाबाद येथे कॅम्प लावून लाभार्थी पात्रता पडताळणीनंतर सर्व लाभार्थ्यांच्या अर्जासाठी आवश्यक असलेल्या दस्ताऐवजाच्या पडताळणीसाठी महामंडळाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांव्यतिरिक्ति बाहेरील त्रयस्थ तज्ञ व्यक्तीची समिती तयार करणेचे ठरले. कर्ज प्रस्तावावर निधी मागणी करण्याबाबतच्या सूचना प्रादेशिक व्यवस्थापक औरंगाबाद यांना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद, नांदेड व परभणी यांना सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी, सेवानिवृत्त गटविकास अधिकारी किंवा अनुभवी बँक व्यवस्थापक अशा तीन सदस्याची समिती गठीत करुन सर्व मंजूर कर्ज प्रकरणात लाभार्थीची पात्रता दस्ताऐवज पडताळणी करुन घेण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) १. प्राप्त अर्जाचे प्रमाणात पुरेसा निधी उपलब्ध नसणे.

२. मार्च, २०२० अखेर निधी प्राप्त झाल्याने सदरील काळात उद्‌भवलेली कोविड सदृश्य स्थिती.

३. प्रलंबित कर्ज प्रकरणे ७-८ वर्षे जुनी असल्याने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन घेणे.

४. योजनेमध्ये सुसूत्रता व पारदर्शकता आणणेकरीता ऑनलाईन प्रक्रिया राबविणे.

---

## चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) येथील औद्योगीक क्षेत्रास पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत

**(१७) १९३३० (१९-०४-२०१७) : तारांकित प्रश्न क्रमांक १४९५५ ला दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) येथील नवीन औद्योगीक क्षेत्र विकसित करण्यासाठी संपादित औद्योगिक क्षेत्राच्या आराखड्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरी देवूनही येथील पायाभूत सोयी सुविधांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजुरी मिळणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी पाणीपुरवठा योजना व पायाभूत सोयी सुविधांना प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२२-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) चिंचोडी (ता.येवला) व विंचूर औद्योगिक क्षेत्रासाठी संयुक्त पाणीपुरवठा योजनेच्या कामाकरीता दिनांक ०९/१२/२०१५ रोजीच्या आदेशान्वये रुपये २०७४.७९ लक्ष (निव्वळ) व रुपये २३८६.०० लक्ष (ठोक) एवढ्या रकमेकरीता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदरचे काम निविदा करारनाम्यानुसार क्र. बी-१/१५ सन २०१७-२०१८ अन्वये दिनांक १५/०५/२०१९ रोजी पूर्ण झाले आहे.

तसेच चिंचोडी औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सोईसुविधा पुरविण्याच्या कामाकरीता दिनांक ३०/१०/२०१७ रोजीच्या आदेशान्वये रुपये १९०७.५८ लक्ष (निव्वळ) व रुपये २१९३.७२ लक्ष (ठोक) एवढ्या रकमेकरीता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदरचे काम निविदा करारनाम्यानुसार क्र. बी-२/३१ सन २०१८-२०१९ अन्वये दिनांक ०५/०४/२०२० रोजी पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील अग्निशमन अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराबाबत

**(१८) ३८०७६ (०५-०४-२०१८) ॲड.निरंजन डावखरे, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) औद्योगिक वसाहतीमधील अग्निशमन केंद्रातील अग्निशमन अधिकारी जवानांकडून गवत काढणे, झाडू मारणे, कचरा उचलणे व कंत्राटी सफाई कामगारांकडून स्वत:च्या घरची कामे करुन घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जवानांना मिळणाऱ्या अतिकालिन भत्त्यातील तीन ते चार हजार रुपये कपात करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग क्र. १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अग्निशमन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२२-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

मुरबाड अग्निशमन केंद्रात एका कंत्राटी सफाई कामगाराची दिनांक १७/०४/२०१७ पासून नियुक्ती करण्यात आली आहे.

अग्निशमन केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या नियुक्ती पत्रामध्ये नमूद केल्यानुसार अग्निशमन केंद्राची इमारत, आजुबाजुचा परिसर, परेडचे मैदान, अग्निशमन केंद्राचा संपूर्ण परिसर स्वच्छ टापटीप ठेवणे व त्याकरीता योग्य ते मैदानी व इतर देखभालीची कर्तव्ये पार पाडणे बंधनकारक आहे.

सदर कंत्राटी सफाई कामगारांकडून कोणत्याही प्रकारची अग्निशमन अधिकाऱ्यांच्या घरची कामे करुन घेतली जात नाहीत.

(२) होय, हे खरे आहे.

म.औ.वि. महामंडळाच्या अग्निशमन विभागाच्या दिनांक १२/०९/२०१७ च्या परिपत्रकानुसार महामंडळाच्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे व शासनाने दिलेल्या आकृतीबंधाप्रमाणे किमान मनुष्यबळामध्ये महामंडळामार्फत अग्निशमन सेवा ही “ना नफा-ना तोटा” या तत्वावर चालवली जाते.

महामंडळाच्या सर्व अग्निशमन केंद्राच्या खर्चाचा आढावा घेतला असता, बहुतांश अग्निशमन केंद्राचा आवर्ती खर्च जमा होणाऱ्या अग्निशमन सेवा शुल्कापेक्षा अतिरिक्त होत असल्याने अग्निशमन केंद्र तोट्यात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अग्निशमन केंद्राच्या आवर्ती खर्चात कपात/ काटकसर करणे गरजेचे आहे. या धोरणानुसार अतिकालीन भत्त्याची मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात आली आहेत. त्यानुसार ठरविण्यात आलेली अनुज्ञेयता तसेच अग्निशमन विभागाचे कर्मचारी दैनंदिन कामकाजात कसुर करत असेल अथवा वरिष्ठांच्या सुचनांचे पालन करत नसेल, कर्तव्य बजावत नसेल तर संबंधित कर्मचाऱ्यांच्या अतिकालीन भत्त्यात कपात करण्यात येते.

(३) मुरबाड औद्योगिक क्षेत्रातील काही कर्मचाऱ्यांनी अग्निशमन अधिकाऱ्यांबाबत तक्रार केली होती. त्यास अनुसरुन महामंडळाच्या अग्निशमन विभागातील अधिकारी यांनी मुरबाड अग्निशमन केंद्राला भेट देवून चौकशी केली होती. तक्रारदार व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले होते व तद्नंतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. केवळ वैयक्तिक आकसापोटी कर्मचारी तक्रारी करीत आहेत, असे निष्पन्न झाल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील समाजकार्य पदवी अंतर्गत येणाऱ्या शासनाच्या विविध विभागातील सेवापदांची पुन:बहाली करण्याबाबत

**(१९) ४५८५४ (०५-१२-२०१८) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजकार्य पदवी अंतर्गत येणाऱ्या शासनाच्या विविध विभागातील सेवापदांसाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर या पात्रतेला शासनामार्फत मान्यता देण्यात आली असल्याने समाजकार्य पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२२-१२-२०२१) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील उद्योग बंद होत असल्याबाबत

**(२०) ४८७४९ (०६-०७-२०१९) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ केव्हा सुरु झाली व किती जमीन महाराष्ट्र विकास महामंडळासाठी अधिग्रहित करण्यात आली तसेच किती उद्योग सुरु करण्यात आले,
(२) असल्यास, महाराष्ट्र विकास महामंडळामध्ये किती उद्योग बंद करण्यात आले व त्यामुळे किती नागरिक बेरोजगार झाले,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (१७-१२-२०२१) :** (१) नागपूर (हिंगणा) ओद्योगिक क्षेत्र सन १९७० ला कार्यान्वित झाले असून या क्षेत्रा करीता ७४५.९३ हे.आर जागा संपादीत केली आहे.या औद्योगिक क्षेत्रात १२९९ (लहान/मोठे) उद्योग कार्यान्वित आहेत.
(२) व (३) नागपूर (हिंगणा) ओद्योगिक क्षेत्रातील २३० उद्योग बंद असून त्यात ३१९२ कामगार कार्यरत असल्याचे महाव्यवस्थापक, जिल्हा औद्योगिक केंद्र यांनी कळविले आहे.

उद्योग विभागाकडून शासन निर्णय दिनांक १८/०८/२०२१ अन्वये पुनरुज्जिवनक्षम व बंद उद्योगांकरीता “विशेष अभय योजना.” राबविली जात आहे. या योजनेंतर्गत पुनरुज्जिवनक्षम नसलेल्या व बंद उद्योगांकडील शासकीय देणी थकीत असल्यास, त्या थकीत देणीची मुद्दल रक्कम एकरकमी भरल्यास, त्यावरील व्याज व दंडव्याज माफ करून, त्या उद्योग घटकाची जमिनीसह स्थिर मालमत्ता अन्य उद्योग घटकांकडे हस्तांतरीत करता येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई